वर्ष १८ वे । अंक ४ था । मे-जून २०२५

# यशदा वार्ता

यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी, पुणे
(महाराष्ट्र शासनाची शिखर प्रशिक्षण संस्था)

## यशदाची राज्य ग्रामीण विकास संस्था देशातील चौथी सर्वोत्कृष्ट संस्था!

### राष्ट्रपतींच्या हस्ते 'पंचायतक्षमता निर्माण सर्वोत्तम संस्थान पुरस्कार' देऊन गौरव!

यशदाची राज्य ग्रामीण विकास संस्था ही देशातील चौथी सर्वोत्कृष्ट राज्य ग्रामीण विकास संस्था ठरली आहे. संस्थेला केंद्र सरकारच्या पंचायत राज मंत्रालयाच्यावतीने 'पंचायत क्षमता निर्माण सर्वोत्तम संस्थान पुरस्कार' राष्ट्रपती मा. द्रौपदी मुर्मु यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. यशदाच्यावतीने पंचायतराजच्या प्रतिनिधी आणि अधिकाऱ्यांची प्रशिक्षणातून प्रभावी क्षमतावृद्धी केली जाते, त्यासाठी हा पुरस्कार प्रदान करण्यात आला आहे. यशदाच्या वतीने उपमहासंचालक मल्लिनाथ कलशेट्टी यांनी हा पुरस्कार स्वीकारला.



## नागरी सेवेतील अधिकाऱ्यांचे विशेष पायाभूत प्रशिक्षण

नागरी सेवेतील विविध पदांवरील एकूण ६९ प्रशिक्षणार्थी अधिकाऱ्यांचा तीन महिन्यांचा विशेष पायाभूत प्रशिक्षण (Special Foundation Course) कार्यक्रम यशदाचे महासंचालक निरंजनकुमार सुधांशू यांच्या पुढाकाराने यशदामध्ये पहिल्यांदाच संपन्न झाला. या प्रशिक्षण कार्यक्रमात IPS, IRTS, IPS, IT, IPOS, IFSO, IA & AS, IIS, C&CS., इत्यादी संवर्गातील एकूण ६९ अधिकाऱ्यांचा समावेश होता. यशदाचे अतिरिक्त महासंचालक राहुल रंजन महिवाल यांनी सत्र संचालक म्हणून काम पाहिले. तर शेखर गायकवाड, पी. शिवा शंकर, पवनीत कौर, मल्लिनाथ कलशेट्टी इत्यादी अधिकाऱ्यांनी सहयोगी सत्र समन्वयक म्हणून काम पाहिले. प्रशिक्षणाच्या तीन महिन्यांच्या यशदातील वास्तव्यात तज्ज्ञ मार्गदर्शकांचे मार्गदर्शन, शारीरिक तंदुरुस्ती-खेळ, योगा प्रशिक्षण, अनुभवकथन, सरावसत्रे इत्यादी सत्रांचेही नियोजन करण्यात आले होते.





# लोकसभा सचिवालयातील ४२ अधिकाऱ्यांची यशदात क्षमताबांधणी!

नवी दिल्ली लोकसभा सचिवालयात कार्यरत असलेल्या ४२ अधिकाऱ्यांसाठी क्षमताबांधणी अर्थात व्यवस्थापन विकास कार्यक्रम प्रशिक्षण हा कार्यक्रम यशवंतराव चव्हाण विकास प्रशिक्षण प्रबोधिनी (यशदा) मध्ये ९ ते १३ जून दरम्यान संपन्न झाला.

यशदामध्ये अलीकडे राज्यातील अधिकाऱ्यांबरोबरच देशातील अनेक राज्यांच्या अधिकाऱ्यांना प्रशिक्षण दिले जात आहे. मागील काही महिन्यापूर्वीच यशदामध्ये राज्यसभेतील अधिकाऱ्यांसाठी प्रशिक्षण घेण्यात आले होते. यापूर्वी केंद्रीय लोकसेवा आयोगाची यूपीएससी परीक्षा उत्तीर्ण झालेल्या आयएएस, आयपीएस व इतर संलग्नित सेवेच्या अधिकाऱ्यांसाठी विशेष प्रशिक्षण यशदात घेण्यात आले. लोकसभेच्या संशोधन व प्रशिक्षण संस्थेच्यावतीने (प्राईड) हे प्रशिक्षण प्रायोजित करण्यात आले आहे.

यशदाच्या मानव विकास केंद्राच्यावतीने लोकसभा सचिवालयात कार्यरत एकूण ४२ अधिकाऱ्यांचा हा पाच दिवसांचा प्रशिक्षण कार्यक्रम संपन्न झाला. या प्रशिक्षण कार्यक्रमाचे उद्घाटन ९ जून रोजी यशदाचे महासंचालक एन.के. सुधांशू यांच्या मार्गदर्शनाखाली अतिरिक्त महासंचालक राहूल रंजन महिवाल, उपमहासंचालक पवनीत कौर आणि लोकसभा सचिवालयाचे संचालक पी.के.मलिक यांच्या उपस्थितीत संपन्न झाले. या प्रशिक्षण कार्यक्रमात कृत्रिम बुद्धीमत्ता, ताणतणाव व्यवस्थापन, संघबांधणी, सायबर सुरक्षा, वेळेचे व्यवस्थापन यासह अन्य विविध विषयांवर तज्ज्ञ मार्गदर्शकांनी मार्गदर्शन केले. या प्रशिक्षण कार्यक्रमाचे सत्रसंचालक म्हणून विनय कुलकर्णी तर सत्र सहाय्यक म्हणून विजय चव्हाण यांनी काम पाहिले.

# 'नक्शा' अंतर्गत सहा राज्यातील ७६ अधिकाऱ्यांना प्रशिक्षण!

## यशदात जमीन प्रशासन आणि व्यवस्थापन उत्कृष्टता केंद्राची स्थापना




यशदाच्या जमीन प्रशासन आणि व्यवस्थापन उत्कृष्टता केंद्राच्यावतीने 'नक्षा' (**NA**tional geospatial **K**nowledge-based land **S**urvey of urban **HA**bitations) हा महत्वाकांक्षी प्रायोगिक प्रकल्प कार्यान्वित करण्यात आला आहे. यामध्ये शहरी जमीन अभिलेखांचे आधुनिकीकरण करण्यासाठी प्रगत भू-स्थानिक (Geospatial) तंत्रज्ञानाचा वापर केला जातो. यामुळे अचूक, सुसंगत आणि अद्ययावत शहरी जमीन अभिलेख तयार करता येणार आहे. या माध्यमातून शहरांच्या प्रभावी नियोजनाला हातभार लागणार आहे. या प्रकल्पांतर्गत महाराष्ट्र गोवा, मध्य प्रदेश, छत्तीसगढ, गुजरात या सहा राज्यातील ७६ अधिकाऱ्यांना दोन प्रशिक्षण कार्यक्रमात सहा दिवसांचे प्रशिक्षण देण्यात आले. हा प्रशिक्षण कार्यक्रम यशदाचे महासंचालक निरंजनकुमार सुधांशू यांच्या संकल्पनेतून घेण्यात आला.

या प्रशिक्षण कार्यक्रमात सर्वेक्षण तंत्रज्ञानाचे मूलभूत ज्ञान, जीएनएसएस आणि सीओआरएस आधारित सर्वेक्षण तंत्र, वेब जीआयएस व जीआयएस अनुप्रयोग, हवाई सर्वेक्षण व ड्रोन तंत्रज्ञानाचा वापर, इलेक्ट्रॉनिक टोटल स्टेशनचा (इटीएस) प्रभावी वापर, संपूर्ण सर्वेक्षण प्रक्रिया, जमीन भूखंडांचे (लँड पार्सेल) स्तर (लेअर्स) तयार करणे व अंतिम रूप देणे तसेच भूमापनाच्या कायदेशीर व प्रशासकीय पैलूंचा अभ्यास आदी विषयांवर तज्ज्ञ मार्गदर्शकांनी मार्गदर्शन केले.

### यशदाच्या जमीन प्रशासन आणि व्यवस्थापन उत्कृष्टता केंद्राबद्दल...

केंद्र सरकारच्या ग्रामीण विकास मंत्रालयाच्या अंतर्गत कार्यरत भू-संपदा विभागाच्या मार्गदर्शनाखाली यशदामध्ये जमीन प्रशासन आणि व्यवस्थापन उत्कृष्टता केंद्र स्थापन करण्यात आले आहे. हे केंद्र संशोधन, प्रशिक्षण आणि क्षमता बांधणीसाठी एक प्रमुख केंद्र म्हणून विकसित करण्यात आले आहे. या केंद्रामार्फत छत्तीसगड, गोवा, गुजरात, महाराष्ट्र, मध्य प्रदेश तसेच केंद्रशासित प्रदेश - दादरा नगर हवेली आणि दमण व दीव या राज्यातील महसूल, नोंदणी, जमीन अभिलेख आणि इतर जमीन संबंधित विभागातील अधिकारी व कर्मचारी यांना प्रशिक्षण देण्यात येते.

# मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत यशदात ग्रामविकास व पंचायतराज विभागाची राज्यस्तरीय कार्यशाळा




ग्रामविकास विभागाच्यावतीने यशदा येथे दोन दिवसीय 'ग्रामविकास व पंचायतराज विभाग – राज्यस्तरीय कार्यशाळा' संपन्न झाली. या कार्यशाळेचे उद्घाटन राज्याचे मुख्यमंत्री मा. देवेंद्र फडणवीस यांनी केले. यावेळी ग्रामविकास व पंचायतराज विभागाचे मंत्री जयकुमार गोरे, राज्यमंत्री योगेश कदम, प्रधान सचिव एकनाथ डवले, यशदाचे महासंचालक निरंजनकुमार सुधांशू, उपमहासंचालक डॉ. मल्लीनाथ कलशेट्टी, राज्यातील सर्व विभागीय आयुक्त, मुख्य कार्यकारी अधिकारी, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी तसेच प्रकल्प संचालक उपस्थित होते.

# नगरनियोजनातील आव्हाने आणि उपाय धोरण यावर चर्चासत्र

**PUNE URBAN DIALOGUE**
CHALLENGES & SOLUTIONS

**पुणे महानगरपालिका, यशदा, पब्लिक इंटरेस्ट सेंटर आणि बर्वे चॅरिटेबल ट्रस्ट यांचा उपक्रम**

पुणे महानगरपालिकेच्या अमृत महोत्सवानिमित्त तसेच पुणे महानगरपालिकेचे पहिले आयुक्त श्री.एस.जी.बर्वे यांच्या स्मृतीप्रित्यर्थ पुणे महानगरपालिका, यशदा, पब्लिक इंटरेस्ट सेंटर आणि बर्वे चॅरिटेबल ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने राज्याचे मुख्यमंत्री मा. देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत यशदामध्ये 'पुणे अर्बन डायलॉग : आव्हाने आणि उपाय' या धोरण चर्चासत्राचे (Policy Seminar) आयोजन करण्यात आले होते. या चर्चासत्राच्या उद्घाटनप्रसंगी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री मा. देवेंद्र फडणवीस, उच्च व तंत्रशिक्षण मंत्री मा. चंद्रकांत पाटील, नगर विकास राज्यमंत्री मा. माधुरी मिसाळ, माजी मुख्य सचिव डॉ. नितीन करीर, विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार, यशदाचे महासंचालक निरंजनकुमार सुधांशू, पुणे महानगरपालिकेचे आयुक्त डॉ.राजेंद्र भोसले, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे आयुक्त शेखर सिंह यांच्यासह विविध विभागाचे वरिष्ठ अधिकारी आदी उपस्थित होते. उपस्थितांनी शहर नियोजनाबाबत मार्गदर्शन केले.




या चर्चासत्रामध्ये राज्याच्या मुख्य सचिव सुजाता सौनिक, माजी मुख्य सचिव सीताराम कुंटे, रमानाथ झा, भाप्रसे (नि.), सेंटर ऑफ एक्सलन्स इन अर्बन ट्रान्सपोर्टचे डॉ. एस. स्वामी, माजी नगर रचनाकार व्ही.के.पाठक, विजय केळकर, बर्वे ट्रस्टचे विश्वस्त भूषण करंदीकर आदींनी विविध विषयांवर मार्गदर्शन केले.



## यशदाच्या अधिकाऱ्यांची हैदराबादच्या 'टी-हब' आणि 'टी-वर्क्स' ला भेट

यशदाच्या अधिकाऱ्यांनी नुकतीच हैदराबाद येथील टी-हबला भेट दिली. या अभ्यासदौऱ्यात यशदाचे महासंचालक निरंजनकुमार सुधांशू, उपमहासंचालक पवनीत कौर, निबंधक राजीव नंदकर, माहिती तंत्रज्ञान विभागाचे प्रमुख शाहुराज मोरे, व्यवस्थापन विकास केंद्राच्या शितल कचरे, परीक्षा नियंत्रक विश्राम देशपांडे, जनसंपर्क अधिकारी डॉ. बबन जोगदंड यांचा सहभाग होता. राज्यात स्टार्टअपला चालना देण्यासाठी हा दौरा महत्वाचा होता.

## टी-हब आणि टी-वर्क्सबद्दल...

**टी-हब** हे एक भव्य तंत्रज्ञान हब असून स्टार्टअप्स, कॉर्पोरेशन्स, शिक्षणसंस्था, गुंतवणूकदार आणि सरकार यांना एकत्र आणण्याचे कार्य करते. हे जागतिक स्तरावरील नवोपक्रम केंद्र असून ५ लाख ८५ हजार चौरस फुटांमध्ये विस्तारले आहे. या केंद्रामध्ये एकावेळी एक हजार स्टार्टअप्स्ना सोयीसुविधा देण्याची क्षमता आहे. उद्योजकतेस चालना देणारे ही एक प्रेरणादायी यंत्रणा आणि प्रेरणास्थान आहे.

**टी-वर्क्स** तेलंगणा सरकारच्या मदतीने चालणारे हे भारतातील सर्वांत मोठे प्रोटोटायपिंग केंद्र आहे. हे केंद्र सेक्शन ८ नॉन-प्रॉफिट संस्था म्हणून कार्य करते. हार्डवेअर उत्पादन नवोपक्रमांना चालना देणे हे केंद्राचे प्रमुख उद्दिष्ट आहे. हे अत्याधुनिक केंद्र ७८,००० चौरस फुटांमध्ये विस्तारले असून विद्यार्थ्यांसह वैयक्तिक नवोपक्रमकर्ते, स्टार्टअप्स, लघुउद्योग, कॉर्पोरेशन्सना यांना त्यांच्या कल्पना प्रत्यक्ष उत्पादनांमध्ये रूपांतरित करण्यात मदत करते.

## यशदा आता सोशल मीडियावरही

यशदाला विविध सोशल मीडियावर फॉलो करण्यासाठी खालील क्युआर कोड स्कॅन करा

@yashadapune

facebook instagram x (twitter)



नोंदणी क्र. MAHMAR/33685/13/1/2008-TC

प्रशिक्षणात प्रावीण्यम्

**यशदा वार्ता**

मर्यादित वितरणासाठी

**प्रेरणा**

**निरंजनकुमार सुधांशू,** भाप्रसे
महासंचालक

**राहुल रंजन महिवाल,** भाप्रसे
अतिरिक्त महासंचालक

**शेखर गायकवाड,** भाप्रसे (से.नि)
अतिरिक्त महासंचालक

**मार्गदर्शन**

**पवनीत कौर,** भाप्रसे
उपमहासंचालक

**मंगेश जोशी,** भाप्रसे
उपमहासंचालक

**सचिन कलंत्रे,** भाप्रसे
उपमहासंचालक

**डॉ. मल्लिनाथ कलशेट्टी,** भाप्रसे (से.नि.)
उपमहासंचालक

**संपादक**

**डॉ. बबन जोगदंड** जनसंपर्क अधिकारी

**उपसंपादक**

**व्यंकटेश कल्याणकर** प्रकल्प संशोधक

**यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी**
यशदा आवार, बाणेर रोड,
पुणे - ४११ ००७
दूरध्वनी: (०२०) २५६०८२२७
E-mail: yashadavarta@gmail.com
Web: www.yashada.org

'यशदा वार्ता' हे द्विमासिक यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी, पुणे करिता कल्याणी कॉर्पोरेशन पुणे यांनी मुद्रित करून यशदा पुणे यांनी प्रकाशित केले आहे.




# महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत नवनियुक्त १४४ अधिकाऱ्यांचे (CPTP) पायाभूत प्रशिक्षण

एकत्रित परिविक्षाधीन प्रशिक्षण कार्यक्रमांतर्गत वर्ग एक संवर्गातील अधिकाऱ्यांचे दोन महिन्यांचे एकत्रित पायाभूत प्रशिक्षण कार्यक्रम (Combined Probationary Training Programme) यशदामध्ये संपन्न झाले. या प्रशिक्षण कार्यक्रमाचे उद्घाटन महासंचालक निरंजनकुमार सुधांशू यांनी केले. या प्रशिक्षण कार्यक्रमात उपजिल्हाधिकारी, पोलीस उपअधिक्षक, शिक्षणाधिकारी, सहायक आयुक्त, तहसीलदार गटविकास अधिकारी, बालविकास अधिकारी आदी संवर्गातील एकूण १४४ अधिकारी सहभागी झाले होते.

या कार्यक्रमाचे सत्र संचालक म्हणून यशदाचे मंगेश जोशी आणि राजीव नंदकर यांनी काम पाहिले. या प्रशिक्षण कार्यक्रमात विविध विषयांवर मान्यवर व्याख्यात्यांनी प्रशिक्षणार्थींना मार्गदर्शन केले.

## यशदाच्या ताथवडे परिसरात वृक्षोत्सव

एक पाऊल, हरीत पृथ्वीकडे...!

- **१२०० हून अधिक देशी झाडांची लागवड**
- **यशदातील प्रशिक्षणार्थी, अधिकाऱ्यांसह स्वयंसेवी संस्था, स्थानिकांचा सहभाग**

यशदाचे महासंचालक निरंजनकुमार सुधांशू यांच्या प्रेरणेतून यशदाच्या ताथवडे येथील परिसरात दर शनिवारी वृक्षारोपणाचा 'वृक्षोत्सव' हा उपक्रम राबविण्यात येत आहे. या उपक्रमांतर्गत आतापर्यंत सहा वेगवेगळ्या कार्यक्रमांद्वारे १२०० हून अधिक देशी झाडांची लागवड करण्यात आली आहे. यशदाच्या ताथवडे येथील परिसराच्या कुंपणाजवळ ही झाडे लावण्यात आली आहेत. या उपक्रमात विविध संस्थांनाही सहभागी करून घेण्यात आले आहे. त्यामध्ये स्थानिक नागरिक, गावातील सरपंच, स्थानिक प्रशासन, आर्ट ऑफ लिव्हिंग, वन विभाग, देवराई अशा संस्थांचा सहभाग आहे. या उपक्रमासाठी यशदाचे उपमहासंचालक मल्लिनाथ कलशेट्टी, यशदातील विविध प्रशिक्षण कार्यक्रमात सहभागी प्रशिक्षणार्थी, यशदातील अधिकारी कर्मचारी यांच्यासह इतर अधिकारीही या उपक्रमात सक्रीय सहभागी होत आहेत.







